# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२३। पान १


# गणपती मंडळाच्या लोकवर्गणीतून शिल्लक राहिलेल्या पैशातून नागरिकांना हेल्मेट वाटप!

## पिंपरी- चिंचवड वाहतूक पोलीस तसेच नागरिकांकडून मोठं कौतुक




**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवडमधील वाघजाई माता मित्र मंडळ यांनी गणेश मंडळांसमोर एक आदर्श घालून दिला आहे. या मंडळाने गणपती मंडळाच्या लोकवर्गणीतून शिल्लक राहिलेल्या पैशातून शंभर दुचाकी चालकांना हेल्मेट दिले आहेत. त्यामुळे या मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे. ही मूळ संकल्पना दिघी- आळंदी वाहतूक विभागाची होती. अशी माहिती पोलीस निरीक्षक सतीश नांदुरकर यांनी दिली आहे. वाहतूक नियमांच्या अभावी तसेच विना हेल्मेट प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा अपघात होऊन अनेक मृत्यू झाले आहेत. त्यामुळे हेल्मेट हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. ते वाटप केल्याने दुचाकी चालकांकडून देखील समाधान व्यक्त होत आहे. आज गणपती विसर्जन असून गणेशभक्त जड अंत:करणाने गणपती बाप्पाला भावपूर्ण निरोप देत असून पुढच्या वर्षी लवकर या असा जयघोष करत आहेत. अनेक गणपती मंडळ लोकवर्गणीतून डीजे लावून तसेच इतर गोष्टींवर वायफळ खर्च करतात. परंतु, दिघी येथील वाघजाई माता मित्र मंडळ यांनी गणपती मंडळाच्या शिल्लक वर्गणीतून गरजू १०० दुचाकी चालकांना हेल्मेट दिले असून एक वेगळा पायंडा पाडल्याच बघायला मिळालं. त्यांच्या या कृतीच पिंपरी- चिंचवड वाहतूक पोलीस तसेच नागरिकांकडून मोठं कौतुक होत आहे. मंडळाचे कार्यकर्ते दिघी वाहतूक पोलीस निरीक्षक नांदुरकर यांच्याकडे गेले होते. त्यांनी पोलिसांसाठी काहीतरी करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावर नांदुरकर यांनी दुचाकी चालकांना हेल्मेट द्या असं सांगितलं होतं. त्यामुळे या मंडळाच्या कार्यकर्त्यांनी गणपती वर्गणीतून शिल्लक रकमेतून १०० दुचाकी चालकांना हेल्मेट दिले आहे.

### हेल्मेट हे अत्यंत महत्त्वाचे

» वाहतूक नियमांच्या अभावी तसेच विना हेल्मेट प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा अपघात होऊन अनेक मृत्यू झाले आहेत. त्यामुळे हेल्मेट हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. ते वाटप केल्याने दुचाकी चालकांकडून देखील समाधान व्यक्त होत आहे.

# तो सेल्फी ठरला अखेरचा; विसर्जन मिरवणुकीत आईचा हंबरडा!

## सहा वर्षांच्या चिमुकल्याचा टाकीत बुडून मृत्यू



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** ढोल-ताशांचा कडकडाट... गणपती बाप्पा मोरयाचा गजर...डॉल्बीवर थिरकणारी तरूणाई...अशा जल्लोषी वातावरणात गुरूवारी (दि. २८) सर्व जण आपल्या लाडक्या बाप्पाच्या विसर्जन मिरवणूकीत सहभागी झाले होते. मात्र त्याच दिवशी एका आईने आपल्या मुलासाठी हंबरडा फोडला होता. पाण्याच्या टाकीत पडून आपल्या लाडक्या मुलाला गमविण्याची वेळ त्या आईवर ऐन विसर्जन मिरवणूकीत आली होती. मिरवणूकीत घटना घडत असताना त्या चिमुकल्याचा आवाज कोणाच्याच कानावर आला नाही. या घटनेची माहिती सोशल मीडीयावर व्हायरल होताना मोशी परिसरासह शहरातील नागरिकांचे ह्रदय हेलावून जात आहे. विसर्जन मिरवणुकीत आरव च्या आईने काढलेली सेल्फी च अरवसाठी अखेरची ठरली. विसर्जन मिरवणूकीत काळजी घेण्याबाबत महापालिका, पोलिस प्रशासन सातत्याने आवाहन करत होते. या आवाहना बरोबरच ठिकठिकाणी दुर्घटना होऊ नये यासाठी प्रशासकीय पातळीवर दक्षताही घेतल्या होत्या. मात्र तरीही काही अनुचित घटना घडल्या आणि नागरिकांच्या दु:खात भर पडल्याचे ऐकायला मिळाले. त्या पैकीच एक मोशीतील घटना आहे. मोशी येथील मंत्रा सोसायटीमध्ये पाण्याच्या टाकीत पडून आरव आशिष पाटील या चिमुकल्याला आपला जीव गमाविण्याची वेळ आली. सोसायटीमध्ये विसर्जन मिरवणूक सुरू असतानाच हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. मिरवणूकीत सुरू असणार्या दंग्यामुळे कदाचित त्या बाळाचा आवाज कोणाच्याच कानावर पडला नसण्याची शक्यता आहे. परिणामी त्या चिमूकल्याला आपला जीव गमवावा लागला. या घटनेनंतर पिंपरी- चिंचवड शहरातील सोसायटी धारकांकडून पाण्याची टाकी किंवा वीज जनरेटर व्यवस्था, एसटीपी, वीजेची उपकरणे आदी ठिकाणी लहान मुलांचा वावर होवू नये, याची काळजी घेण्याबाबत आवाहन केले जात आहे.

### सोशल मीडियावर व्यक्त होतेय हळहळ

» आरव आणि त्याच्या आईचा सेल्फी घेतलेला फोटो शहरात विविध सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. घडलेल्या घटनेचा उल्लेख त्यामध्ये देण्यात आला आहे. आरवला आदरांजली वाहताना अनेकांकडून हळहळ व्यक्त होत आहे. तसेच लहान मुलांची काळजी घेण्याबाबत आवाहन केले जात आहे.

# सरकारच्या विरोधात राष्ट्रवादीचं आंदोलन!

## सूडबुद्धीने कारवाई केल्याचं राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांचे मत




**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आणि आमदार रोहित पवार यांना बारामती ऍग्रो कंपनीला बंद करण्यासंबंधी नोटीस पाठवल्याने शरद पवार गट आक्रमक झाला आहे. पिंपरी- चिंचवडमध्ये शरद पवार गटाने शिंदे-फडणवीस सरकारच्या विरोधात आंदोलन करत जाहीर निषेध केला आहे. सरकारने केलेली कारवाई ही सूडबुद्धीने केली आहे. याचा आम्ही जाहीर निषेध करतो. असं म्हणत पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या समोर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आलं. राष्ट्रवादीचे नेते आणि शरद पवार यांचे नातू रोहित पवार यांची बारामतीमधील बारामती ॲग्रो कंपनीसंबंधी नोटीस बजावण्यात आली असून बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यावरून आता राज्यात राजकारण रंगल आहे. शरद पवार राष्ट्रवादी गट आक्रमक झाला आहे. पिंपरी- चिंचवडमध्ये शहराध्यक्ष आंदोलन करण्यात आलं. शिंदे- फडणवीस सरकारने केलेली कारवाई सूडबुद्धीने केलेली आहे. असं मत यावेळी तुषार कामठे यांनी दिली. यावेळी सरकारच्या विरोधात कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. एकीकडे गेले काही दिवसांपासून रोहित पवार हे भाजप सरकारच्या विरोधात जोरदार टीकास्त्र सोडत होते, त्याचबरोबर ते आक्रमक झाले होते. त्यामुळे तर रोहित पवार यांना नोटीस बजावली नाही ना? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

### राष्ट्रवादी शरद पवार गट आक्रमक

» रोहित पवार यांची बारामतीमधील बारामती ॲग्रो कंपनीसंबंधी नोटीस बजावण्यात आली असून बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यावरून आता राज्यात राजकारण रंगल आहे. शरद पवार राष्ट्रवादी गट आक्रमक झाला आहे. पिंपरी- चिंचवडमध्ये शहराध्यक्ष आंदोलन करण्यात आलं. शिंदे-फडणवीस सरकारने केलेली कारवाई सूडबुद्धीने केलेली आहे. असं मत यावेळी तुषार कामठे यांनी दिली. यावेळी सरकारच्या विरोधात कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

# पिंपरी-चिंचवडमध्ये संततधार; पवना धरण १००% भरले!

## चोवीस तासांत पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ५५ मिली मीटर पाऊस



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड शहरात मंगळवारी रात्रीपासून जोरदार पाऊस पडत आहे. रात्रभर पावसाची संततधार सुरू होती. मागील चोवीस तासांत पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ५५ मिली मीटर पाऊस चिंचवडमध्ये झाला आहे. शहरात शनिवारी जोरदार पाऊस झाला होता. रविवार आणि सोमवार दोन दिवस पावसाने विश्रांती घेतली. मंगळवारी सकाळपासून ढगाळ वातावरण होते. दुपारी थोड्या सरी कोसळल्या. सायंकाळी सात पासून जोरदार पावसाला सुरुवात झाली. रात्री आठ ते नऊ एक तास मुसळधार पाऊस झाला. रात्रभर पावसाची संततधार सुरूच होती. बुधवारी सकाळपासूनच पावसाला सुरुवात झाली आहे. मागील चोवीस तासात चिंचवडमध्ये सर्वाधिक ५५ मिली मीटर पाऊस पडला आहे. त्याखालोखाल तळेगावमध्ये ५०.५ मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे. मुसळधार पावसामुळे चोहीकडे पाणीच पाणी झाले. रस्ते जलमय झाले आहेत. रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांत पाणी साचल्याने रस्ते जलमय झाले होते. परिणामी, वाहतूक संथ गतीने झाली आहे. दरम्यान, पवना धरण १०० टक्के भरल्याने रात्रीपासून धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे. १४०० क्युसेक्सने नदीत पाणी सोडण्यात येत आहे. पावसाचे प्रमाण पाहता धरणाच्या सांडव्यावरून पवना नदीपात्रामध्ये पाण्याचा विसर्ग सुरू करण्याची दाट शक्यता आहे. नदी काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

### रात्रभर संततधार

» रात्री आठ ते नऊ एक तास मुसळधार पाऊस झाला. रात्रभर पावसाची संततधार सुरूच होती. बुधवारी सकाळपासूनच पावसाला सुरुवात झाली आहे. मागील चोवीस तासात चिंचवडमध्ये सर्वाधिक ५५ मिली मीटर पाऊस पडला आहे. त्याखालोखाल तळेगावमध्ये ५०.५ मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे.

# पुण्यात पावसाचा धुमाकूळ!

## सिंहगड रस्त्यावर धोकादायक स्थिती अनेक घरात पाणी

पुणे।
न्यूज एक्सप्रेस मराठी।
हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजाप्रमाणे गणेश विसर्जन मिरवणुकीच्या दरम्यान पुणे आणि मुंबईत जोरदार पावसाने हजेरी लावली. पुण्यात तर पावसाने धुमाकूळ घातला. पुण्यातील कोथरूड, कर्वेनगर, सिंहगड रस्ता, धायरी, वारजे, माळवाडी, सूस, बावधन यासह इतर भागात झालेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच त्रेधा तिरपीट उडाली. कोथरूड परिसरातील अनेक सोसायट्या, घरांमध्ये पाणी शिरले आहेत. त्यामुळे नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. तसेच प्रशासनाचे सर्व परिस्थितीवर बारीक लक्ष असून बचाव कार्य सुरू आहे. कोथरूड परिसरात असलेल्या प्रतिज्ञा मंगल कार्यालय आणि आसपासचा परिसर जलमय झाला आहे. काल दुपारी चार नंतर शहरात पावसाला सुरुवात झाली. कात्रज, आंबेगाव, धायरी, नर्हे, खडकवासला, वारजे, माळवाडी, कर्वेनगर, कोथरूड, सुस, बावधन या भागात प्रचंड मोठ्या प्रमाणात पावसाने हजेरी लावली. पावसाला सुरूवात होताच अवघ्या काही मिनिटातच रस्त्याला नदीचे स्वरूप आले होते. सिंहगड रस्त्यावर वडगाव पूल, पाटील हॉस्पिटल, इनामदार चौक येथे मोठ्या प्रमाणात पाणी तुंबल्याने वाहतूक व्यवस्था कोलमडून गेली होती. त्यातच आयुक्त विक्रमकुमार हे टिळक चौकात मानाच्या गणपतीचे स्वागत करण्यासाठी उपस्थित होते. मात्र, या घटनेची माहिती मिळताच त्यांनी तेथून घटनास्थळी धाव घेतली. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी तुंबल्याने रस्त्यावरील वाहने बंद पडली. त्यामुळे वाहतूकीस आणखीनच अडथळा निर्माण झाला. पाण्याला प्रचंड प्रवाह असल्याने सिंहगड रस्त्यावर धोकादायक स्थिती निर्माण झालेली होती. सुदैवाने पावसाचा जोर कमी झाल्याने आता रस्त्यावरील पाण्याचा निचरा होत आहे. प्रशासनाने तत्काळ हालचाली करत रस्त्यांवर तुबलेले पाणी कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला. दरम्यान संपूर्ण परिस्थितीची माहिती घेत पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रशासनाला योग्य त्या सूचना केल्या आहेत. तातडीने सर्व मदत कार्य करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. आयुक्तांनी स्वतः कोथरूडमध्ये जाऊन सर्व पाहणी केली व प्रशासनाला वेगाने काम करण्यासाठी कामाला लावले. रात्री साडेआठच्या सुमारास या भागातील स्थिती नियंत्रणात आली. आयुक्त विक्रम कुमार म्हणाले की, 'मुसळधार पावसामुळे शहराच्या वेगवेगळ्या भागात पाणी जमा झालेले आहे.



### बचाव कार्य सुरू : पालकमंत्री


» कोथरूड परिसरात असलेल्या प्रतिज्ञा मंगल कार्यालय आणि आसपासचा परिसर जलमय झाला आहे. काल दुपारी चार नंतर शहरात पावसाला सुरुवात झाली. कात्रज, आंबेगाव, धायरी, नर्हे, खडकवासला, वारजे, माळवाडी, कर्वेनगर, कोथरूड, सुस, बावधन या भागात प्रचंड मोठ्या प्रमाणात पावसाने हजेरी लावली. पावसाला सुरुवात होताच अवघ्या काही मिनिटातच रस्त्याला नदीचे स्वरूप आले होते. सिंहगड रस्त्यावर वडगाव पूल, पाटील हॉस्पिटल, इनामदार चौक येथे मोठ्या प्रमाणात पाणी तुंबल्याने वाहतूक व्यवस्था कोलमडून गेली होती. त्यातच आयुक्त विक्रमकुमार हे टिळक चौकात मानाच्या गणपतीचे स्वागत करण्यासाठी उपस्थित होते. मात्र, या घटनेची माहिती मिळताच त्यांनी तेथून घटनास्थळी धाव घेतली.

# वीजबिलांच्या थकबाकीमुळे वीज पुरवठा खंडित!

## संतप्त ग्राहकांनी महावितरणच्या २ महिला कर्मचाऱ्यांना डांबले

पुणे।
न्यूज एक्सप्रेस मराठी।
वीजबिलांच्या थकबाकीमुळे वीज पुरवठा खंडित केल्याच्या रागातून डेक्कन येथील दोघांनी महावितरणच्या दोन महिला तंत्रज्ञांना सुमारे दोन तास डांबून ठेवले. अंगावर कुत्रे सोडले. शेवटी पोलिस दाखल झाल्यानंतर त्यांनी या महिला कर्मचाऱ्यांची सुटका केली. याप्रकरणी दोन्ही आरोपीविरुध डेक्कन पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

याबाबत माहिती अशी की, डेक्कन उपविभाग अंतर्गत महिला तंत्रज्ञ करुणा आढारी व रूपाली कुटे प्रभात रोड परिसरात थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याचे शासकीय कर्तव्य बजावत होत्या. दरम्यान सरस्वती अपार्टमेंटमधील वीजग्राहक आरती ललित बोदे यांच्याकडे ५ हजार २०६ रुपयांची थकबाकी असल्याने त्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. त्यानंतर ग्राहकाकडून तात्काळ वीजपुरवठा सुरु करण्यास ऑनलाइन वीजबिल भरण्यास नकार देण्यात आला व धनादेश स्वीकारण्यास सांगण्यात आले. मात्र आम्हाला स्वतः धनादेश स्वीकारता येत नाही असे या महिला तंत्रज्ञांनी सांगितल्यावर आरती बोदे व ललित बोदे यांनी त्यांना शिविगाळ सुरु केली. नाईलाजाने या महिला तंत्रज्ञ तिसऱ्या मजल्यावरून खाली जाण्यास निघाल्या असता त्यांना लिफ्टमधून जाण्यास मज्जाव करण्यात आला. त्यानंतर त्या जिन्यातून जात असताना बोदे व वॉचमनकडून जिन्याचे सेफ्टी डोअर बंद करण्यात आले. त्यामुळे या दोघी तंत्रज्ञ जिन्यात अडकल्या. त्याचवेळी त्यांच्यावर दोन कुत्रे सोडण्यात आले. कुत्रे त्यांच्यावर भूंकत असताना आढारी व कुटे यांनी तात्काळ महावितरणच्या कार्यालयात व पोलिस ठाण्यात संपर्क साधला. या प्रकारानंतर महावितरणचे स्थानिक कार्यालयातील अभियंते व अनेक कर्मचारी या इमारतीमध्ये आले. त्यांनी डांबून ठेवलेल्या दोन्ही महिला कर्मचाऱ्यांना सोडण्याची विनंती केली. मात्र त्यास कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. दरम्यान माहिती मिळाल्यानंतर पोलीस तातडीने दाखल झाले व या दोन्ही महिला तंत्रज्ञांची सुटका करण्यात आली. दरम्यान सरस्वती अपार्टमेंटमधील वीजग्राहक आरती ललित बोदे यांच्याकडे ५ हजार २०६ रुपयांची थकबाकी असल्याने त्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. त्यानंतर ग्राहकाकडून तात्काळ वीजपुरवठा सुरु करण्यास ऑनलाइन वीजबिल भरण्यास नकार देण्यात आला व धनादेश स्वीकारण्यास सांगण्यात आले. याप्रकरणी महावितरणकडून करण्यात आलेल्या तक्रारीनंतर डेक्कन पोलिस ठाण्यात आरोपी ललित बोदे व आरती ललित बोदे विरुद्ध भादंवि ३५३, ३४१, ३४२, ५०४, ३४, महाराष्ट्र पोलिस अधिनियम १०६ व ११७ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे.



### महिलांनी केली शिवीगाळ

» मात्र आम्हाला स्वतः धनादेश स्वीकारता येत नाही असे या महिला तंत्रज्ञांनी सांगितल्यावर आरती बोदे व ललित बोदे यांनी त्यांना शिविगाळ सुरु केली. नाईलाजाने या महिला तंत्रज्ञ तिसऱ्या मजल्यावरून खाली जाण्यास निघाल्या असता त्यांना लिफ्टमधून जाण्यास मज्जाव करण्यात आला. त्यानंतर त्या जिन्यातून जात असताना बोदे व वॉचमनकडून जिन्याचे सेफ्टी डोअर बंद करण्यात आले. त्यामुळे या दोघी तंत्रज्ञ जिन्यात अडकल्या. त्याचवेळी त्यांच्यावर दोन कुत्रे सोडण्यात आले. कुत्रे त्यांच्यावर भूंकत असताना आढारी व कुटे यांनी तात्काळ महावितरणच्या कार्यालयात व पोलिस ठाण्यात संपर्क साधला.

# विसर्जन मिरवणुकीत ध्वनिपातळी किती?

## खंडूजीबाबा चौकात तब्बल १२९ डेसिबल





**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** ढोल ताशांचे, ध्वनिवर्धकांच्या भिंती यांनी गणेश विसर्जन मिरवणुकीत ध्वनिप्रदूषणाच्या मर्यादांचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाले आहे. यंदा लक्ष्मी रस्त्यावरील विसर्जन मिरवणुकीत सरासरी १०१.३ डेसिबल ध्वनिपातळीची नोंद झाली. त्यातही रात्री आठ वाजता खंडूजीबाबा चौकात तब्बल १२९ डेसिबल ध्वनिपातळी नोंदवली गेली. सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या उपयोजित विज्ञान आणि मानव्यविज्ञान विभागातर्फे विसर्जन मिरवणुकीतील ध्वनिप्रदूषणाची मोजणी करण्यात आली. यंदा या उपक्रमाचे २३वे वर्ष होते. डॉ. महेश शिंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे नियोजन जयवंत नांदोडे आणि इशिता हुमणाबादकर यांनी केले. सुयोग लोखंडे, इंद्रजीत देशमुख, पार्थ धोटे, रणदिग्विजय जाधव, अथर्व डांगे, आदित्य संजीवी, आनंद पाणजकर, तेजस जोशी, शार्दुल लोकापुरे, शितीज राजपूत या विद्यार्थ्यांनी नोंदी घेतल्या. इरा कुलकर्णी, सात्विका उदयकुमार, समृद्धी तागडे, गायत्री ठकार, पद्मेश कुलकर्णी, नागेश पवार यांनी आकडेवारीचे विश्लेषण केले. केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या निकषांनुसार दिवसा निवासी क्षेत्रात ५५ डेसिबल, औद्योगिक क्षेत्रात ७५ डेसिबल, रात्री निवासी क्षेत्रात ४५ डेसिबल, औद्योगिक क्षेत्रात ७० डेसिबल ध्वनिपातळी असणे अपेक्षित आहे. विसर्जन मिरवणुकीच्या उत्साहात या मर्यादा गणेश मंडळे, ढोलताशा पथके, ध्वनिवर्धकांकडून सरळ धुडकावल्या गेल्याचे आकडेवारीवरून सिद्ध होते. गेल्यावर्षीच्या विसर्जन मिरवणुकीत लक्ष्मी रस्त्यावर सरासरी १०५ डेसिबल ध्वनिपातळी नोंदवली गेली होती. त्या तुलनेत यंदा किंचित घट झाली. मात्र नोंदवली गेलेली ध्वनिपातळी आरोग्यासाठी हानिकारक मानली जाते.

### यांनी केले आकडेवारीचे विश्लेषण

**» डॉ. महेश शिंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे नियोजन जयवंत नांदोडे आणि इशिता हुमणाबादकर यांनी केले. सुयोग लोखंडे, इंद्रजीत देशमुख, पार्थ धोटे, रणदिग्विजय जाधव, अथर्व डांगे, आदित्य संजीवी, आनंद पाणजकर, तेजस जोशी, शार्दुल लोकापुरे, शितीज राजपूत या विद्यार्थ्यांनी नोंदी घेतल्या. इरा कुलकर्णी, सात्विका उदयकुमार, समृद्धी तागडे, गायत्री ठकार, पद्मेश कुलकर्णी, नागेश पवार यांनी आकडेवारीचे विश्लेषण केले.**

# इटलीच्या तरुणीने गाजवली विसर्जन मिरवणूक!

## मर्दानी खेळ करत जिंकली पुणेकरांची मनं



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुण्यातील गणेशोत्सव आणि महाराष्ट्राच्या मर्दानी खेळांची नेहमीच जगाला भुरळ पडली आहे. पुण्यातील गणेशोत्सव मिरवणुकीतही हे मर्दानी खेळ पाहायला मिळतात. महिला आणि तरुणीदेखील या खेळांमध्ये हिरिरीने सहभागी होतात. दरम्यान, यंदा या मिरवणुकीत एक परदेशी महिलादेखील मर्दानी खेळ खेळताना दिसली. ॲना मारा असं या तरुणीचं नाव असून ती काही दिवसांपासून पुण्यात आहे. खास शिवकालीन मर्दानी खेळ शिकण्यासाठी ती आणि तिची मैत्रीण बेली गंधार पुण्यात आल्या आहेत. बेली ही मूळची स्पेनची तर ॲना इटालियन आहे. बेली आणि ॲना या दोन्ही परदेशी तरुणींनी पुण्यात श्री शिवाजीराजे मर्दानी आखाड्यात या खेळाचं प्रशिक्षण घेतलं. यापैकी ॲनाने गुरुवारी (२८ सप्टेंबर) पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणुकीत आपलं कौशल्य दाखवत पुणेकरांची मनं जिंकली. बेली आणि ॲना या दोघींनी शिवाजीराजे मर्दानी आखाड्याच्या इन्स्टाग्राम पेजवर मर्दानी खेळाचे व्हिडीओ पाहिले. लहान मुली आणि तरुणी सफाईदारपणे मर्दानी खेळ खेळत असल्याचे व्हिडीओ पाहून बेली आणि ॲनाला या खेळाची भुरळ पडली. लाठीकाठी, दांडपट्टा, तलवारबाजीचे व्हिडीओ पाहून त्यांनाही हा खेळ शिकण्याची इच्छा झाली. त्यानंतर लगोलग दोघींनी पुणे गाठलं. पुण्यात येऊन दोघींनी शिवकालीन मर्दानी खेळ शिकून घेतले. तसेच कालच्या मिरवणुकीत या खेळांची प्रात्यक्षिकं सादर केली.

### पुणेकरांची मनं जिंकली

**» यंदा या मिरवणुकीत एक परदेशी महिलादेखील मर्दानी खेळ खेळताना दिसली. ॲना मारा असं या तरुणीचं नाव असून ती काही दिवसांपासून पुण्यात आहे. खास शिवकालीन मर्दानी खेळ शिकण्यासाठी ती आणि तिची मैत्रीण बेली गंधार पुण्यात आल्या आहेत. बेली आणि ॲना या दोन्ही परदेशी तरुणींनी पुण्यात श्री शिवाजीराजे मर्दानी आखाड्यात या खेळाचं प्रशिक्षण घेतलं. यापैकी ॲनाने गुरुवारी (२८ सप्टेंबर) पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणुकीत आपलं कौशल्य दाखवत पुणेकरांची मनं जिंकली.**

# पुण्यात यंदाही मोठ्या गणपतींचे विसर्जन लांबले

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुण्यातील मोठ्या गणपतींचे विसर्जन यंदाही लांबले आहे. यावर्षी पुणे पोलिस व श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या पदाधिकाऱ्यांनी विसर्जन मिरवणूक लवकर सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार ४.३० वा. मिरवणुकीत सहभागी झालेल्या दगडूशेठचे रात्री ९ च्या सुमारास विसर्जनही झाले. पण त्यानंतर अखिल मंडई, बाबू गेनू, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी, राजाराम आदी मंडळांची मिरवणूक उशिराने सुरू झाल्यामुळे विसर्जनाला विलंब झाला. यासंबंधीच्या वृत्तानुसार, दगडूशेठनंतर उपरोक्त मंडळांऐवजी इतर मंडळांना लक्ष्मी रस्त्यावरील विसर्जन मिरवणुकीत सहभागी होण्याची परवानगी देण्यात आली. त्यामुळे या मोठ्या मंडळांची विसर्जन मिरवणूक दीड वाजल्यानंतरही सुरू झाली नाही. त्यामुळे दगडूशेठ हलवाई गणपतीचे विसर्जन झाल्यानंतर विसर्जन मिरवणूक लवकर संपेल हा अंदाज साफ चुकला. या प्रकरणी पुण्यातील गणेश मंडळांतील अंतर्गत स्पर्धा चर्चेचा विषय बनली आहे. १० दिवसांचा पाहुणचार घेऊन बाप्पांनी काल निरोप घेतला. भक्त मंडळी पाणावलेल्या डोळ्यांसह जड अंतःकरणाने बाप्पाला निरोप देत आहेत. पण पुण्यात मात्र गणेश विसर्जन यंदाही २ दिवस चालणार का? अशी वेगळीच चर्चा सुरू होती. कारण अखिल मंडई, बाबू गेनू, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी, राजाराम आदी मंडळांची मिरवणूक बराच वेळ सुरूच होऊ शकली नाही. त्यामुळे दगडूशेठ हलवाई गणपतीचे विसर्जन झाल्यानंतर विसर्जन मिरवणूक लवकर संपेल हा अंदाज चुकला. गतवर्षी पुण्यातील विसर्जन मिरवणूक जवळपास ३० तास चालली होती. यंदा हा प्रकार टाळण्यासाठी पुणे पोलिस व गणेश मंडळांत बैठक झाली. त्यात नियोजनही करण्यात आले.